# ख्रिस्ती साहित्याकडून माझ्या अपेक्षा

(डॉ. रंजन केळकर, पुणे)

मी एक सेवानिवृत्त हवामानशास्त्रज्ञ आहे. माझे पन्नासहून अधिक शोधनिबंध दर्जेदार वैज्ञानिक नियतकालिकांत प्रसिद्ध झाले आहेत. किती तरी आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक सम्मेलनांत त्यांचे निष्कर्ष मी सादर केले आहेत. अशा नियतकालिकांत आणि सम्मेलनांत ख्रिस्ती वैज्ञानिकांसाठी 'कोटा' नसतो. तुमचा धर्म विचारला जात नाही. फक्त तुमचे संशोधन नवीनतम आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरचे असावे लागते.

पण ख्रिस्ती साहित्याचे तसे नाही. ख्रिस्ती साहित्य सर्वसामान्य साहित्याहून निराळे असते. ख्रिस्ती साहित्यिक एका वेगळ्याच श्रेणीचे असतात. ते त्यांचे साहित्य ख्रिस्ती मासिकांत प्रसिद्ध करतात. ख्रिस्ती साहित्य सामान्य बाजारात विकत घेता येत नाही. त्यासाठी खास दुकानांत जावे लागते. ख्रिस्ती साहित्यावर चर्चा करण्यासाठी वेगळी सम्मेलने भरवावी लागतात. ख्रिस्ती साहित्याचे 'दलित' आणि 'उच्चवर्णीय' असेही विभाजन केले जाते.

## ख्रिस्ती साहित्य म्हणजे काय?

असे हे ख्रिस्ती साहित्य आहे तरी काय? ख्रिस्ती आणि ख्रिस्तीतर साहित्यात काय मूलभूत फरक आहे? किंवा काय फरक असला पाहिजे? ख्रिस्ती साहित्याची अधिकृत व्याख्या कोणी केली आहे का आणि केली असेल तर तिला सर्वसंमती मिळाली आहे का? साहित्याला ख्रिस्ती हे विशेषण जोडताना कोणते निकष सामान्यपणे लावले जातात?

ज्यांचा धर्म ख्रिस्ती आहे अशा लेखकांनी काहीही लिहिले तर ते आपोआप ख्रिस्ती साहित्य म्हणून गणले जाते का? ख्रिस्ती धर्मप्रचारासाठी लिहिलेले किंवा

भाषांतरित केलेले लेख, पुस्तके, गीते, ख्रिस्ती साहित्यात मोडतात का? ख्रिस्ती लोकांसाठी, ख्रिस्ताविषयी किंवा ख्रिस्ती धर्माविषयी ख्रिस्तीतर लेखकांनी लिहिलेल्या साहित्याला ख्रिस्ती साहित्य म्हणता येते का? उदाहरणार्थ, पाडगावकरांचा नवा करार ख्रिस्ती साहित्य आहे का? किंवा मी हवामानाविषयी तीन इंग्रजी पाठ्यपुस्तके प्रकाशित केली म्हणून मी ख्रिस्ती साहित्यिक झालो का?

वर दिलेल्या आणि माझ्या मनात असलेल्या अशा आणखी काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे मला सहजपणे सापडली असती तर मी हा लेख लिहिलाच नसता, आणि कदाचित ती सापडणार पण नाहीत ह्याची मला जाणीव आहे. म्हणून ह्या सर्व व्याख्यांच्या वादात न पडता, खिस्ती साहित्य कसे असावे ह्याविषयी मला स्वतःला काय वाटते, आणि ख्रिस्ती साहित्याकडून माझ्या काय अपेक्षा आहेत ह्याविषयी मी येथे थोडक्यात लिहिणार आहे.

## ख्रिस्ती जीवनाचे दर्शन

प्रथमतः मला असे वाटते की, साहित्याच्या माध्यमातून वाचकाला वास्तविक किंवा कल्पित जीवनाचे दर्शन व्हावे हा जर साहित्याचा एक हेतू असेल, तर ख्रिस्ती आणि ख्रिस्तीतर जीवनांमध्ये जो फरक आहे किंवा असावा, तो ख्रिस्ती साहित्यातून व्यक्त झाला पाहिजे.

माझी अपेक्षा ही आहे की, ख्रिस्ती डॉक्टर हा दुसऱ्या डॉक्टरांपेक्षा अधिक निःस्वार्थी सेवा करणारा असावा. ख्रिस्ती नर्स ही इतर परिचारिकांपेक्षा अधिक प्रीतीने व सद्भावाने रोग्यांची शुश्रुषा करणारी असावी. ख्रिस्ती शिक्षक हा सामान्य शिक्षकांपेक्षा विद्यार्थ्यांना चांगली नीतिमूल्ये शिकवणारा असावा. ख्रिस्ती प्रशासक आपल्या कामात इतरांपेक्षा जास्त प्रामाणिक आणि कर्तृत्ववान असावा. त्याचप्रमाणे

मला असे वाटते की, ख्रिस्ती लेखक हा स्वतः ख्रिस्ती जीवन जगणारा असावा, म्हणजे त्याच्या लेखणीतून आपोआप ख्रिस्ती साहित्य उतरेल.

संत पौलाने देहाची कामे कोणती आणि आत्म्याची फळे कोणती हे स्पष्ट केले आहे. तो म्हणतो,

*आता देहाची कामे उघड आहेत आणि ती हीः जारकर्म, अमंगळपणा, कामातुरपणा, मूर्तिपूजा, जादूटोणा, वैर, कलह, ईर्ष्या, राग, विरोध, फुटी, गट, मत्सर, धुंदी, दंगल आणि ह्यांसारखी आणखी; ह्यांविषयी मी जसे पूर्वी सांगितले होते तसे आता आधी सांगतो की, ह्या गोष्टी करणाऱ्यांना देवाचे राज्य वतन मिळणार नाही. पण आत्म्याची फळे ही आहेतः प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, सदिच्छा, विश्वास, सौम्यता, संयमन; अशांविरुद्ध कोणताही नियम नाही. आणि जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी देहाला भावनांसहित व वासनांसहित वधस्तंभावर खिळले आहे. आपण आत्म्याने जगत आहो तर तसेच आत्म्याने नीट चालू या.*

माझी अपेक्षा ही आहे की, ख्रिस्ती लेखकांनी निर्माण केलेले साहित्य आत्म्याने प्रेरित असले पाहिजे आणि त्यातून देहाची कामे नाही, तर आत्म्याची फळे वाचकांना दिसली पाहिजेत. येशू ख्रिस्ताने स्वतः सांगितले होते की,

*तुम्ही त्यांच्या फळांवरून त्यांना ओळखाल. काटेऱ्यांवरून द्राक्षं किंवा केंकरीवरून अंजीर गोळा करतात काय? तसंच प्रत्येक चांगलं झाड चांगलं फळ देतं, पण कुजकं झाड वाईट फळ देतं. चांगलं झाड वाईट फळ देऊ शकत नाही; आणि कुजकं झाड चांगलं फळ देऊ शकत नाही. जे चांगलं फळ देत नाही असं प्रत्येक झाड तोडून अग्नीत टाकलं जातं. म्हणून तुम्ही त्यांच्या फळांवरून त्यांना ओळखाल.*

## आरक्षणनीती नको

खिस्ती साहित्याविषयीची माझी दुसरी अपेक्षा ही आहे की, ते दर्जेदार असावे. खिस्ती साहित्याला आरक्षणनीती लागू असू नये. जशी आरक्षणामध्ये वयोमर्यादा वाढवली जाते, गुणवत्तेचे नियम शिथिल केले जातात, तसे 'मी खिस्ती लेखक आहे म्हणून माझ्या खिस्ती वाचकांनी माझ्या शुद्धलेखनाकडे, व्याकरणाकडे, भाषेकडे दुर्लक्ष करावे' अशी विनंती करणे चुकीचे आहे. संत पौलाने हेही म्हटले आहे की,

*शब्दाने किंवा कृतीने कराल ते सर्व काही प्रभू येशूच्या नावाने करा; आणि त्याच्या द्वारे देवपित्याचे उपकार माना.*

आपण जे काही करतो, ते प्रभू येशू खिस्ताचे नाव घेउन करावे. आपण जर साहित्यनिर्मिती करीत असू तर ती प्रभूच्या नावाला शोभेल अशीच असावी.

## सुवार्तेची घोषणा

माझी तिसरी अपेक्षा ही आहे की, खिस्ती साहित्याच्या माध्यमातून देवाच्या प्रीतीची, प्रभू येशूच्याद्वारे त्याने देऊ केलेल्या तारणाची सुवार्ता गाजवली गेली पाहिजे. आपल्याला 'सेक्यूलर' म्हणजे निधर्मी शैलीतल्या कथा, कविता, कादंबऱ्या लिहायची पूर्ण मोकळीक आहे. आपण खट्याळ गाणी, वात्रट विनोद, अश्लील गोष्टी, नकारात्मक अभिप्राय, लिहू शकतो. पण हे काम कोणीही करू शकेल. त्यासाठी खिस्ती असायची गरज नाही. पौल म्हणतो,

*सर्व गोष्टींची मला मोकळीक आहे, पण सर्व गोष्टी हिताच्या नसतात.*

आपल्या देशात आपल्याला धर्मस्वातंत्र्य आहे, ह्यासाठी आपण परमेश्वराचे सतत उपकार मानले पाहिजेत कारण कित्येक देशांत हे स्वातंत्र्य नाही. तसेच, विचार करण्याचे आणि विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्यही आपल्या देशात आहे.

परंतु, आपली मते दुसऱ्यांच्यावर लादण्याचे आपल्याला स्वातंत्र्य नाही. आपल्या शाळांत आपण सर्व विद्यार्थ्यांकडून प्रभूची प्रार्थना सक्तीने वदवून घेऊ शकत नाही. आपल्या दवाखान्यांत आपण रोग्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या आत्म्यांसाठी प्रार्थना करू शकत नाही. आपला देश ब्रिटिश राजवटीखाली असताना, शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या त्रस्त असलेल्या लोकांना जशी सुवार्ता ऐकवली जात असे, तसे आपण आज केले, तर लोकांच्या परिस्थितीचा गैरफायदा घेतल्याचा आरोप आपल्यावर नक्कीच केला जाईल. परंतु सर्व जगाला सुवार्ता सांगा ही आपल्या प्रभूची आज्ञा आपण आता पाळायची नाही असा ह्याचा अर्थ नाही. ह्यासाठी ख्रिस्ती साहित्याचा उपयोग केला गेला पाहिजे. आपण कोणीही असू, समाजात आपले स्थान कोणतेही असो, संत पौलाने सांगितल्याप्रमाणे, 'मी जगतो असे नाही तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो', हे आपले आजच्या युगातले ब्रीद असले पाहिजे. असे झाले तर आपल्या वागणुकीतून, बोलण्यातून, लिहिण्यातून, ख्रिस्त इतरांना व्यक्त झाल्याशिवाय राहणार नाही. ख्रिस्ती समाजसेवा, ख्रिस्ती शिक्षण, ख्रिस्ती प्रशासन, ख्रिस्ती साहित्य ह्यांचे निराळेपण काय आहे हे दाखवून द्यायचे असेल तर हा एक मार्ग आपल्याला खुला आहे.

सारांश, माझ्या मते, ख्रिस्ती साहित्य कथा, कविता, कादंबरी, निबंध, प्रवासवर्णन, विश्लेषण, किंवा चरित्र अशी विविध रूपे घेऊ शकेल, पण त्यामुळे वाचकांच्या मनात ख्रिस्ताविषयी उत्सुकता निर्माण झाली पाहिजे, वाचक ख्रिस्ताकडे आकर्षित झाले पाहिजेत. ख्रिस्ती साहित्याच्या माध्यमाद्वारे लोकांना ख्रिस्ताची ओळख पटावी, त्यातून ख्रिस्ताने लोकांशी बोलावे, त्यातून ख्रिस्ताने लोकांना त्याच्याकडे बोलवावे.

(संदर्भः गलतीकरांस पत्र ५:१९-२५, मत्तयाचे शुभवर्तमान ७:१६-२०, कलसैकरांस पत्र ३:१७, करिंथकरांस पहिले पत्र ६:१२, गलतीकरांस पत्र २:२०)